International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 1, Jan-Mar 2026 ID: IJCRTA000235 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचे विश्लेषण

**संध्याताई मारोतीराव वाघमारे* & प्रा. डॉ. माधव माणिकराव चोले****

**Author Affiliation:**
*संशोधक विद्यार्थिनी (राज्यशास्त्र), संशोधन केंद्र- देगलूर महाविद्यालय देगलूर, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड
Email: sandhyasuman0802@gmail.com
**प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग. देगलूर महाविद्यालय देगलूर, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

**Citation of Article:** वाघमारे, एस. एम., & चोले, एम, एम. (2026). भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचे विश्लेषण. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 6 (1), pg. 70-75. ijcrta.org

## १. सारांश

जगातील कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचा पाया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया हा आहे. भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे भारतीय राजकारण आणि प्रशासनात निवडणुका महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतीय निवडणूक प्रक्रिया सतत विकसित होत असली तरी पारदर्शकतेचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. पूर्वी मतपत्रिकेपासून ते ईव्हीएम मतदान प्रणाली, निवडणूक निधी, माध्यमांचा वापर आणि निवडणूक आयोगाची स्वायत्तता हे चार मुख्य घटक निवडणूक पारदर्शकतेवर थेट परिणाम करतात. निवडणुकीमध्ये होत असलेल्या वाढत्या पैशाच्या वापरामुळे त्याचा परिणाम हा निवडणूक आणि त्यांच्या निकालावर होत असतो. त्यामुळे वर्तमान शोधनिबंध या सर्व घटकांचा विश्लेषणात्मक अभ्यास करून निवडणुकीतील पारदर्शकतेच्या सद्यस्थितीचे विश्लेषण करेल, तसेच वर्तमान निवडणूक पद्धतीत असलेल्या उणिवांची चर्चा करून निवडणुका कशा प्रकारे पारदर्शक करता येतील याचे विश्लेषण केले जाईल.

## २. प्रस्तावना

लोकशाही व्यवस्थेचा पाया निवडणूक प्रक्रियेवर आधारित असतो, जनतेकडून, जनतेसाठी आणि जनतेद्वारे शासन चालवले जाते,ही लोकशाहीची संकल्पना निवडणुकीद्वारेच प्रत्यक्षात येते. भारतासारख्या विशाल, बहुविध आणि लोकसंख्येने समृद्ध देशात निवडणूक प्रक्रिया ही केवळ सत्तेचे हस्तांतरण करणारी यंत्रणा नसून ती लोकशाही मूल्ये, संविधानिक तत्वे आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारी एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता हा लोकशाहीच्या गुणवत्तेचा आणि विश्वासार्हतेचा कणा मानला जातो.

भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची तरतूद करून प्रत्येक नागरिकाला समान मतदानाचा हक्क प्रदान केला आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त घटनात्मक संस्थेमार्फत निवडणूक प्रक्रिया राबवली जाते. मतदार नोंदणीपासून ते निकाल जाहीर होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया नियमबद्ध, कायदेशीर आणि लोकशाही मूल्यांशी सुसंगत असावी, ही अपेक्षा असते. मात्र, प्रत्यक्ष व्यवहारात निवडणूक प्रक्रियेत पैशाचा प्रभाव, बाहुबलाचा वापर, राजकीय गुन्हेगारीकरण, निवडणूक खर्चाची अपारवर्शकता, माध्यमांचा गैरवापर, सोशल मीडियावरील दिशाभूल करणारी माहिती,

तसेच प्रशासकीय पक्षपात यांसारख्या अनेक समस्या दिसून येतात. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

पारदर्शकता म्हणजे निर्णयप्रक्रिया, कार्यपद्धती आणि परिणाम याबावत नागरिकांना स्पष्ट, विश्वासार्ह व वेळेवर माहिती उपलब्ध होणे होय. निवडणूक प्रक्रियेत पाप्रदर्शकता असल्यास मतदारांचा विश्वास दृढ होतो, लोकशाहीची गुणवत्ता वाढते आणि सत्ताधारी व राजकीय पक्षांवर उत्तरदायित्व निश्चित होते. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा मतदार नोंदणी, मतदार यादी अद्ययावत करणे, उमेदवारी अर्ज व छाननी, प्रचार, मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे या सर्व टप्प्यांमध्ये पारदर्शकता अत्यावश्यक आहे.

अलीकडच्या काळात माहिती व तंत्रज्ञानाच्या वापरामुळे भारतीय निवडणूक प्रक्रियेत अनेक सुधारणा झाल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (EVM), व्हीव्हीपॅट (VVPAT), ऑनलाईन मतदार नोंदणी, निवडणूक खर्च निरीक्षण यंत्रणा, तसेच सोशल मीडिया मॉनिटरिंग यांसारख्या उपाययोजनांनी पारदर्शकतेत वाढ करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, या तंत्रज्ञानाच्या वापराचाचतही शंका, टीका आणि विश्वासाचा अभाव काही प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे तंत्रज्ञानामुळे पारदर्शकता बाडते की नवीन प्रश्न निर्माण होतात, याचे चिकित्सक मूल्यमापन करणे आवश्यक ठरते.

या सर्व पार्श्वभूमीवर "भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचे विश्लेषण" हा शोधनिबंध महत्त्वाचा ठरतो. या संशोधनाचा उद्देश भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेची सद्यस्थिती समजून घेणे, विद्यमान व्यवस्था कितपत प्रभावी आहे याचे विश्लेषण करणे, पारदर्शकतेसमोरील आव्हाने ओळखणे आणि निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह व लोकशाहीदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचवणे हा आहे. अशा प्रकारे हा शोधनिबंध भारतीय लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक योगदान देण्याचा प्रयत्न करतो.

**३. शोध लेखाची उद्दिष्टे:**

१. भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेची संकल्पना स्पष्ट करणे.
२. निवडणूक आयोगाची भूमिका व कार्यपद्धतीचे विश्लेषण करणे.
३. तंत्रज्ञानाचा निवडणूक पारदर्शकतेवर झालेला परिणाम अभ्यासणे.
४. निवडणूक प्रक्रियेतील अपारदर्शकतेची कारणे शोधणे.
५. पारदर्शकता वाढविण्यासाठी आवश्यक उपाय सुचवणे.

**४. शोध लेखाची गृहितके:**

१. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेची संकल्पना, स्वरूप व गरज यांचे विश्लेषण करणे.
२. ईव्हीएम व व्हीव्हीपॅटसारख्या तांत्रिक साधनांच्या वापरामुळे मतदान व मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकता वाढली आहे.
३. निवडणूक प्रक्रियेत माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी पारदर्शकतेस चालना देते.
४. निवडणूक प्रक्रियेत पैशाचा व बाहुबलीचा वाढता वापर पारदर्शकतेवर प्रतिकूल परिणाम करतो.

**५. मुख्य विषयाचा आशय आणि उपमुद्दे:**

**१. निवडणूक प्रक्रियेची संकल्पना व स्वरूप:**

निवडणूक प्रक्रिया म्हणजे लोकशाही शासनव्यवस्थेतील नागरिकांच्या सहभागाची औपचारिक व घटनात्मक यंत्रणा होय. या प्रक्रियेद्वारे जनतेकडून प्रतिनिधी निवडले जातात व शासनाची रचना होते. भारतामध्ये निवडणूक प्रक्रिया संविधानातील कलम ३२४ अंतर्गत स्थापन केलेल्या भारतीय निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली राबवली जाते. निवडणूक प्रक्रियेचे स्वरूप व्यापक असून त्यात मतदार नोंदणी, उमेदवार निवड, प्रचार, मतदान, मतमोजणी व निकाल जाहीर करणे यांचा समावेश होतो. ही संपूर्ण प्रक्रिया लोकशाही मूल्ये, समता, स्वातंत्र्य आणि न्याय यांवर आधारित असणे आवश्यक आहे.

**२. पारदर्शकतेची संकल्पना व महत्त्व:**

पारदर्शकता म्हणजे निर्णयप्रक्रिया व प्रशासनिक कार्यपद्धती नागरिकांसमोर स्पष्ट, खुले आणि उत्तरदायी ठेवणे होय. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असल्यास मतदारांचा विश्वास वाढतो, लोकशाही मजबूत होते आणि सत्तेचा गैरवापर टाळला जातो. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता ही नैतिक मूल्य तसेच घटनात्मक गरज आहे. पारदर्शकतेचा अभाव असल्यास निवडणूक प्रक्रियेवर संशय निर्माण होतो व लोकशाही व्यवस्थेची विश्वासार्हता कमी होते.

**३.पारदर्शकतेची संकल्पना (Concept of Transparency)**:

पारदर्शकता (Transparency) ही लोकशाही व्यवस्थेतील एक मूलभूत संकल्पना असून ती शासन, प्रशासन व निवडणूक प्रक्रिया खुली, स्पष्ट, समजण्यास सोपी आणि जबाबदेही बनविण्यावर भर देते.

**४. पारदर्शकतेचा अर्थ:**

पारदर्शकतेचा अर्थ असा की, निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा- निर्णयप्रक्रिया, नियम, आर्थिक व्यवहार, प्रशासनिक कृती व निकाल सार्वजनिक तपासणीस खुला असावा.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता म्हणजे मतदार नोंदणीपासून निकाल जाहीर होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया निष्पक्ष व विश्वासार्ह असणे,

निवडणूक यंत्रणांमध्ये गोपनीयता व स्पष्टता यांचा समतोल राखला जाणे, आणि नागरिकांना माहिती मिळण्याचा अधिकार सुनिश्चित केला जाणे.

लोकशाहीत सत्ता जनतेकडून निवडून दिलेल्या प्रतिनिधींना मिळते; त्यामुळे ती सत्ता कशी वापरली जाते, याची माहिती जनतेला मिळणे ही पारदर्शकतेची मुख्य अट आहे.

**५. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेचे घटक:**

भारतीय निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता पुढील घटकांवर अवलंबून असते-

- मतदार यादीची अचूकता व सार्वजनिकता
- उमेदवारांची पात्रता व पार्श्वभूमीची माहिती उपलब्धता
- राजकीय पक्षांच्या व उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची पारदर्शक नोंद
- प्रचार प्रक्रियेतील नियमांची अंमलबजावणी
- मतदान व मतमोजणी प्रक्रियेतील तांत्रिक व प्रशासकीय स्पष्टता
- निवडणूक आयोगाची स्वायत्तता व निष्पक्ष भूमिका

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 1, Jan-Mar 2026 ID: IJCRTA000235 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

**6) पारदर्शकतेचे महत्व:**

पारदर्शक निवडणूक प्रक्रिया ही मतदारांच्या लोकशाही वरील विश्वास दृढ करते. काळा पैसा , अपारदर्शक राजकीय निधी, मत खरेदी, प्रशासकीय पक्षपात,भ्रष्टाचार वगैरे प्रकारांवर नियंत्रण ठेवते. पारदर्शकता आहे निवडणूक आयोग, प्रशासकीय अधिकारी, राजकीय पक्ष व उमेदवार यांना त्यांच्या कृतीसाठी जनतेसमोर उत्तरदायी बनवते. तसेच मतदारांच्या राजकीय जाणवेत वाढ करून देते त्यामुळे मतदानाचा दर्जा सुधारतो.

थोडक्यात, या शोधनिबंधातून ागरिकांच्या मताधिकाऱ्याच्या सुरक्षिततेबाबत आणि निष्पक्ष निवडणुकीबाबत नवे दृष्टिकोन मिळतात.

**7) भारतीय निवडणूक प्रक्रियेतील प्रमुख टप्पे आणि पारदर्शकता:**

**१. मतदार नोंदणी व मतदार यादी:**

मतदार नोंदणी ही निवडणूक प्रक्रियेची पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे. मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक असणे पारदर्शकतेसाठी आवश्यक आहे. दुबार नोंदणी, मृत मतदारांची नावे, स्थलांतरित मतदारांचे प्रश्न हे पारदर्शकतेसमोरील मोठे अडथळे आहेत.

**२. उमेदवारी अर्ज व छाननी:**

उमेदवारांची पात्रता, गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता व उत्पन्नाची माहिती सार्वजनिक करणे ही पारदर्शकतेची महत्त्वाची बाब आहे. उमेदवारी अर्जाची छाननी निष्पक्ष व नियमांनुसार झाली पाहिजे.

**३. निवडणूक प्रचार:**

निवडणूक प्रचारात खर्च मर्यादा, माध्यमांचा वापर, आचारसंहिता यांचे पालन होणे आवश्यक आहे. पैशाचा प्रभाव, खोटी माहिती, सोशल मीडियाचा गैरवापर यामुळे पारदर्शकता बाधित होते.

**४. मतदान प्रक्रिया:**

मतदान प्रक्रिया मुक्त, निष्पक्ष आणि गुप्त असणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (EVM) आणि व्हीव्हीपॅट प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र या यंत्रणांबाबत काही शंका आणि वाद देखील उपस्थित होतात.

**५. मतमोजणी व निकाल जाहीर:**

मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक असल्यास निवडणूक निकालांवर जनतेचा विश्वास राहतो. निरीक्षकांची उपस्थिती, उमेदवार प्रतिनिधींची देखरेख व तत्काळ निकाल जाहीर करणे ही पारदर्शकतेची लक्षणे आहेत.

**8) समस्येचे स्वरूप:**

पारदर्शकतेचा अभाव हा प्रणालीगत आहे म्हणजे निवडणूक यंत्रणेत असलेली गुंतागुंत, कायदेशीर कमतरता, आणि तांत्रिक अनिश्चितता यांचा एकत्रित परिणाम होतो. पारदर्शकतेच्या अभावामुळे लोकशाहीवरील विश्वास डळमळतो आणि नागरिकांच्या राजकीय सहभागावर परिणाम होतो. निवडणूक आयोगाने विविध सुधारणा (EVM, VVPAT,

RTI, Model Code of Conduct etc.) केल्या असल्या तरी त्यांचा परिणाम सर्व स्तरांवर समान दिसून येत नाही. भारतीय निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेविषयी नागरिक, माध्यमे आणि संशोधकांमध्ये सतत प्रश्न उपस्थित होत आहेत. पारदर्शकता राखण्यासाठी तंत्रज्ञान, कायदे आणि प्रशासनिक सुधारणा केल्या असल्या तरी त्यांच्या परिणामकारकतेबद्दल मतभेद आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा चिकित्सक अभ्यास करून तिच्या मर्यादा, अडथळे आणि सुधारणा यांचा सखोल अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

**9) निवडणूक प्रक्रियेतील अपारदर्शकतेची प्रमुख कारणे:**

१. राजकीय पक्षांच्या निधीची अपारदर्शकताआढळून येते.
२. पैशाचा व बाहुबलाचा प्रभाव वाढलेला दिसून येतो.
३. राजकीय गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे.
४. माध्यमांचा व सोशल मीडियाचा गैरवापर केला जातो.
५. प्रशासकीय हस्तक्षेप
६. मतदारांमध्ये जागरूकतेचा अभाव

**10) उपाय:**

१. राजकीय पक्षांच्या निधीवर कठोर नियंत्रण ठेवणे.
२. निवडणूक आयोगाची स्वायत्तता बळकट करणे
३. निवडणूक खर्चाची प्रभावी अंमलबजावणी करणे.
४. मतदार शिक्षण व जनजागृती करणे.
५.सोशल मीडियावर नियमन ठेवणे.

**निष्कर्ष:**

निवडणूक आयोगाची भूमिका भारतीय संविधानाने दिलेली एक स्वायत्त आणि महत्त्वाची जबाबदारी आहे. ज्यामध्ये निवडणूक प्रक्रियेचे नियोजन, संचालन आणि नियंत्रण यांचा समावेश होतो. यात नामांकन प्रक्रिया, मतदान, मतमोजणी, आणि निकाल जाहीर करणे हे सर्व समाविष्ट आहे, जेणेकरून निवडणुका निष्पक्ष आणि लोकशाही पद्धतीने पार पडतील. निवडणूक आयोग उमेदवारांना, पक्षांना, आणि मतदारांना योग्य नियम व कायदे वळवून निवडणुकीत सहभागी करून घेतो. निवडणूक बाँड योजना रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या २०२४ च्या निर्णयाने पारदर्शकता कायम ठेवली आहे. भारतीय लोकशाहीच्या सुदृढतेसाठी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेमुळे, EVM-VVPAT यंत्रणेच्या वापरामुळे आणि आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे भारताने निवडणुकीत मोठा विश्वास निर्माण केला आहे. तथापि, निवडणूक निधीतील अस्पष्टता, उमेदवारांच्या गुन्हेगारी

पार्श्वभूमी, पैशाचा आणि शक्तीचा गैरवापर, तसेच सोशल मीडियावरील दिशाभूल करणारी माहिती या बाबी अजूनही पारदर्शकतेसमोर आव्हान ठरतात. यासाठी निवडणूक निधीची पारदर्शकता, ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मतदार जनजागृती, स्थलांतरित व दिव्यांग मतदारांसाठी सुलभ सुविधा, आणि निवडणूक आयोगाला अधिक अधिकार देणे हे आवश्यक आहे. शेवटी, पारदर्शक निवडणूक ही केवळ तांत्रिक किंवा कायदेशीर बाब नसून ती

Volume 6, Issue 1, Jan-Mar 2026 ID: IJCRTA000235 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

मतदारांचा विश्वास, पक्षांची जबाबदारी आणि समाजाच्या लोकशाही संस्कृतीशी निगडित आहे. म्हणूनच, सर्व संबंधित घटकांचा सहकार्यानेच भारतीय निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि लोकशाहीस पोषक ठरू शकते.

**संदर्भ सूची:**

१. Citizens' Commission on Elections (CCE), IIT Delhicse.iitd.ac in

२. Election Commission of India (ECI) https://eci.gov.in

3. Press Information Bureau (PIB) https://pib.gov.in

4. Association for Democratic Reforms (ADR)-https://adrindia.org

5. Bhattacharya, D.C. Transparency and Accountability in Indian Politics. New Delhi. Sage Publications, २०१९.

6. राणे, सौ. सीमा, भारतीय निवडणुकीतील सुधारणा आणि पारदर्शकता. कोल्हापूरः सुविचार प्रकाशन, २०२०.

7. सावंत, आर. व्ही. लोकशाहीतील पारदर्शकता आणि जबाबदारी. औरंगाबादः यश प्रकाशन, २०२१

8. शिंदे, दिलीप. निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया, ग्रंथाली प्रकाशन

9. शेख, नासिर. कासम, (२०२१). भारतातील निवडणूक सुधारणांचे विश्लेषणात्मक अध्ययन. Journal of Arts. Humanities and Social Sciences. १. ४७ ते ५०.

10. भोळे, डॉ. भा. ल. (२०११). भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे प्रकाशन.

11. पाटील, डॉ. सोनाली शिवाजी. (२०१८). भारतातील निवडणूक प्रक्रिया.